जळगाव (प्रतिनिधी) दि. २३ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागात दिनांक २१ फेब्रुवारी रोजी जागतिक मातृभाषा दिन व मराठी भाषा गौरव दिन सप्ताहाचे औचित्य साधून काव्यलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलतांना डॉ. मनीषा इंदाणी यांनी मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित करत साहित्यनिर्मितीचे प्रयोजन स्पष्ट केले. साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी नसून समाजप्रबोधन, संस्कारसंवर्धन, मूल्यजागृती आणि भावविश्व समृद्ध करण्यासाठी असते, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिंतनशीलता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे हे साहित्यनिर्मितीचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर काव्यलेखन कार्यशाळेचे मार्गदर्शक म्हणून डॉ. रणजित पारधे त्यांनी साहित्यनिर्मितीतील प्रमुख घटकांवर सविस्तर चर्चा केली. कल्पनाशक्ती, अनुभूती, संवेदनशीलता, भाषा कौशल्य, आशयाची मांडणी आणि शैली वैशिष्ट्य हे साहित्य निर्मितीचे मूलभूत घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एखाद्या कवीची वैचारिक पातळी आणि अनुभवविश्व त्याच्या लेखनातून प्रतिबिंबित होत असते, असेही त्यांनी नमूद केले. काव्यगुणांविषयी बोलताना त्यांनी ओज, माधुर्य आणि प्रसाद हे काव्याचे प्रमुख गुण असल्याचे सांगितले.

सदर कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष काव्यलेखन करून घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक विषयांवर कविता सादर केल्या. डॉ. पारधे यांनी प्रत्येक कवितेवर मार्गदर्शन करत आवश्यक सुधारणा सुचविल्या. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल अभिमानाची भावना दृढ होऊन त्यांच्या सर्जनशील क्षमतेला चालना मिळाली. शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने अशा साहित्यिक उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात येणार असल्याची माहिती कार्यशाळेच्या शेवटी देण्यात आली.

या प्रसंगी व्यासपीठावर आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालिका डॉ. मनीषा इंदाणी, कार्यशाळेचे मार्गदर्शक डॉ. रणजित पारधे आणि डॉ. स्वाती तायडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आणि आभार प्रदर्शन वीरसिंग पावरा याने केले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २३ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे दि. २१ फेब्रुवारी रोजी 'जागतिक मातृभाषा दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर ता.साक्री येथील प्रा. सतीश म्हस्के यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म. सु. पगारे, लेवा बोलीतील ज्येष्ठ साहित्यिक अरविंद के नारखेडे, कवयित्री संध्या महाजन, जयश्री काळवीट, तुषार वाघुळदे आदि उपस्थित होते.

महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठी ही प्रमाणभाषा म्हणून ओळखली जात असली तरी महाराष्ट्रात मराठी सोबत अनेक बोली बोलल्या जातात. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे काव्य हे पूर्व खानदेशातील लेवा बोलीतून लिहिले आहे. त्यामुळे दैनंदिन जीवन व्यवहार हा भाषेतून होत असताना प्रामुख्याने या हृदयाचे त्या हृदयाला भिडण्यासाठीची भावना ही मातृभाषेतूनच प्रकट होते. म्हणून साहित्य हे खऱ्या अर्थाने बोलीतून अधिकाधिक समृद्ध होऊ शकते असे प्रा. डॉ. सतीश म्हस्के म्हणाले.

खान्देश हा प्रांत आहे या खान्देश प्रांतात अनेक बोली बोलल्या जातात. या प्रांतात ९०% पर्यंत अहिराणी बोली बोलणारे लोक राहतात. यासोबतच दहा टक्के लेवा बोली, तावडी बोली, जामनेरी बोली, गुर्जरी बोली, भिलाऊ बोली, पावरा, मावची, कोकणी, तडवी अशा बोली बोलणारे अल्पसंख्यांक लोकसुद्धा राहत असल्याचे प्रा. पगारे यांनी सांगितले. यावेळी मातृभाषा दिनानिमित्ताने लेवा बोलीतून असलेला सौ. सुनिता येवले यांचा 'मह्य आंगन' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला. त्यानिमित्ताने लेवा बोलीचा संदर्भ घेऊन प्रा.डॉ. म. सु. पगारे पुढे म्हणाले की, प्रत्येकाला आपल्या मातृभाषेवर प्रेम करण्याचा अधिकार आहे. आपले विचार प्रकट करताना मातृभाषेतून ते अधिक प्रभावीपणे प्रकट करता येतात. या कवितासंग्रहात सुनिताताई येवले यांनी लेवा बोलीतील शब्दांचे समानार्थी शब्द देत प्रत्येक कवितेसमोर त्या कवितेचा भावार्थ प्रकट व्हावा म्हणून कालबाह्य होत चाललेल्या गोष्टींना दृश्यमान करताना जो चित्रांचा वापर केलेला आहे तो अत्यंत परिणामकारक असा आहे. ही उर्मी ही ऊर्जा त्यांचे शब्दांवरील प्रेम अभिव्यक्त करत असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमासाठी भाषा अभ्यास प्रशाळेतील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भारती सोनवणे यांनी केले तर आभार महेश सूर्यवंशी यांनी मानले.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २३ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'बौद्धिक संपदा हक्क' विभागामार्फत 'पारंपरिक ज्ञान संवर्धन आणि नवसंशोधनासाठी बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर २६ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत भौगोलिक मानांकन क्षेत्रातील ख्यातनाम तज्ञ् ॲड. गणेश हिंगमिरे (पुणे), सुप्रसिद्ध लेखिका प्रा. मृदुला बेले (नाशिक), महाराष्ट्र राष्टीय कायदा विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. प्रकाश चौधरी (मुंबई), बौद्धिक संपदा हक्क तज्ज्ञ डॉ. खुशबू भुरट (पुणे), श्री. दीपंकर रॉय (नवी दिल्ली) व श्री.संदीप सिंघल (नवी दिल्ली) उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

खान्देश परिसरातील पारंपरिक ज्ञान, जैवविविधता आणि स्थानिक कौशल्ये यातून जास्तीत जास्त प्रमाणात भौगोलिक मानांकन नोंदणी होण्यासाठी या परिषदेचा फायदा होणार आहे. आतापर्यंत जळगाव केळी, जळगाव भरीत वांगे आणि नवापूर तूर डाळ या तीन उत्पादनांना भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. याव्यतिरिक्त चमेली बोरं, मेहरूण बोरं, जळगाव शेव भाजी, डाळगंडोरी, कंदी पेढे इत्यादी उत्पादनांना जर भौगोलिक मानांकन प्राप्त होऊ शकते आणि त्याद्वारे उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा होऊ शकतो.

त्याचप्रमाणे सध्या खान्देश परिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगीतिकरण होऊ घातले आहे. या नवउद्योजकांनी त्यांची उत्पादने व उत्पादन पद्धती यांचे स्वामित्व हक्क (पेटंट), कॉपीराईट, व्यापार चिन्हे, व्यापार गुपिते इत्यादी प्रकारच्या बौद्धिक संपदा हक्कांनी सुरक्षित करून ठेवल्यास त्याद्वारे त्यांची औद्योगीक भरभराट होऊ शकते.

तरी संबंधित क्षेत्रातील व्यावसायिक, संशोधक, संस्था आणि इच्छुकांनी या परिषदेत उपस्थित राहण्याचे आवाहन परिषदेचे समन्वयक प्रा. विकास गीते (९४२००६७३२१) आणि सचिव डॉ. सारंग बारी (८९९९५९१६६२) यांनी केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ — दिनांक: २३ फेब्रुवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता